वाचन ठेवून भावी आयुष्यात एखादी कादंबरी किंवा साहित्याची निर्मिती तुमच्या हातून व्हावी असं मला मनोमन वाटत कारण एक प्रकारची नवनिर्माणक्षमता तुमच्याजवळ आहे. केवळ मराठी विभागातच तुमची लोकप्रियता नाही तर, कॉमर्स हिंदी सर्वच विभागात तुमचं नाव घेतलं जात इतकंच काय सर तर उदयगीरी कॉलेजमधील बऱ्याच विद्यार्थ्यांच्या तोंडून तुमच नाव मी ऐकल आहे. याप्रमाणेच पुढील आयुष्यातही तुमचा नावलौकिक व्हावा.

या दोन वर्षात अनमोल असं मार्गदर्शन तुम्ही केलत सर, एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या कलागुणांनाही तुम्ही महत्व दील त्या कलेचा नेहमीच आदर केला. वेळोवेळी विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेण्यासाठी आवर्जुन सांगितल. संगीत आणि साहित्य याचा संगम तुमच्यात आहे. या कलेची जाण आणि आवड अभि-रुची तुमच्याजवळ आहे.. खरच सर संगीत आणि साहित्याला अढळ असं स्थान आपल्या जीवनात आहे. सत्कार्याची भावनाही तुमच्या जवळ आहे. वेळोवेळी विद्यार्थ्यांना तुम्ही मदत करतात.

सर तुम्ही या दोन वर्षात मला खूप सहकार्य केल. वेळप्रसंगी गौरवही केलात, पण कधीही रागवला नाहीत हे मात्र खरं. एकस्पर्धेलाला जवळपास संपूर्ण सहकार्य तुम्ही केलात वेळप्रसंगी धीरही दीलात. योग्यवेळी योग्य समज मला दीली. परीक्षेत मार्जिनुसार अ-लोकशला तर ते सांगितल प्रस्तावना समारोपाचे परीच्छेद योग्य प्रकारे कसे पाडावेत वेळीच वहीत आलेल्या ऱ्हस्व दीर्घाच्या चुका, अगदी या बारीक सारीक गोष्टीकडे आवर्जुन लक्ष देवून वेळीच योग्य असं मार्गद-र्शन तुम्ही केलात. ग्रंथालयात योग्य पुस्तकांची निवड करून दिली. व माझे काही गहाळ आलेले पुस्तक कार्डची झालेली अदलाबदली वेळीच दुरुस्त केली. पुस्तकाच्या बाबतीतही भरपूर सहकार्य तुमच्या कडून झाल आहे. एक विशेष मला मराठीत स्वाक्षरी करण्याची सवय लागली. याच श्रेय (तुम्हाला जात) तुमच्याकडे आहे! पुढील आयुष्या-तही तुम्हाला आमच्यासारखे विद्यार्थी लाभावेत आणि आम्हाला तुमच्यासार-सारखे गुरु. (जे समजस मीत्राप्रमाणे, सुस्वभावी मनाने वागतात.)



आपली आज्ञाधारक
स्वाक्षरी – शीतल

विद्यार्थ्यांचे नाव – कु. शीतल काशीनाथ बिरादार
पूर्ण पत्ता –
* मु. बटनपूर पो. लासोना.
ता. देवणी जी. लातूर.
* माधव मेडीकल जाधव,
कॉम्पलेक्स शिवाजी
सोसायटी उदगीर पि. N.251035
* रामनगर श्याम कॉलनी
उदगीर – 'सौरभ निवास'

सत्यं शिवं सुंदरम्    दिनांक:- ७-३-२००५

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर.

एम.ए. व्दितीय वर्ष(मराठी)

शैक्षणिक वर्ष २००४-२००५

## 'अभिप्राय'



प्रति,
प्रा.म.ई.तंगावार
मराठी विभाग

"गुरूर ब्रह्मा गुरूर विष्णू गुरूर देवो महेश्वर
गुरू साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ॥"

सर तुम्ही विद्यार्थ्यांशी नेहमीच मायाप्रमाणेच वागलात. परीक्षा, सेमीनार वर्गातील शिकवणीच्या वेळेला मात्र योग्य ती तटस्थता, समतोलपणा तुमच्याजवळ आहे. मराठी वाङ्मयाचा अभ्यास अगदी कालखंडानुसार कुठेही विस्कळीतपणा न आणता क्रमबद्ध रीतीने समजून सांगितला म्हणूनच अशा इतिहाससारख्या विषयात जवळपास बऱ्याच विद्यार्थ्यांनी ७०/७५ च्या वर गुण घेतलेले आहेत. समीक्षेसारखा अवघड पेपर वेगवेगळी उदाहरणे देऊन सोप्या पद्धतीने शिकवले आहे, इतके की आजही त्या टीपन (नोट्स) वाचताना वर्गात शिकवणीला बसल्यासारखे वाटते. सर तुमच्या भाषेवर थोड्या प्रमाणात कानडी भाषेचा प्रभाव जाणवतो. शिकवणीच्या वेळेला तुम्ही प्रत्येक विद्यार्थ्याकडे आवर्जून लक्ष देतात हे मी पाहिलय विद्यार्थ्यांचे शिकवणीकडे लक्ष आहे की नाही याबरोबरच आपण शिकवत असलेला विषय हा विद्यार्थ्यांना कितपत समजत आहे याचेही भान तुमच्याजवळ दिसून येते. आम्ही विचारलेल्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर तुमच्याकडून मिळत.

सर तुमचे वाचन भरपूर आहे. मराठीच्या विषयाबरोबरच हिंदी, इंग्रजी या इतर साहित्याचा अभ्यास तुम्ही केला असे मला वाटते. मराठीच्या विषयावर पेपरमधील (वृत्तपत्रातील) अनेक लेख मी वाचले आहेत उदा: कोकणातील जीणं, दलितप्रदा-यावरील लेख. हा दलितकुटुंबावरील लेख मला खूप आवडला. सर तुम्ही तर त्याच्या प्रतीमेच शब्दात केलेले वर्णन अत्यंत सुंदर आहे. अगदी या प्रमाणेच हिंदी इंग्रजी कानडी भाषेवरही तुमचे प्रभुत्व असावे असे वाटते. सर तुम्ही असेच अखंड

कृपया मागे पहा

सर जरा जास्तीच लिहल आहे.
माफ करा. जे लिहायच होत ते तर राहूनच
गेल हे अभिप्राय वाचल्यानंतर लक्षात आल.
सर तुम्ही कधीच का रागवत नाहीत?
म्हणजे वर्गात उशीरा जरी आल तर चालत.
खर तर हे चुकीचच आहे. आम्हा मुलींना
उशीर होतो हे खर कारण घरची कामही
असतात. किंवा काही इतर कारण ही असतात.
ते तुम्ही समजून घेतात हे ठीक. पण
याचा परीणाम असा झाला आहे की मी
तर परीक्षेला सुद्धा खूप उशीर केला.
पण आम्ही मुली काय विचार करतो की काही
नाही सर काही म्हणत नाहीत. थोडस
तुम्ही रागावलात म्हणजे चांगल. सर
रागावतात या भीतीने तरी आम्ही म्हणजे
आताच्या इतर मुली घरातून लवकर बाहेर
पडतील. खर तर परीक्षेच्या काळात तुम्ही
वेळोवेळी सूचना दिली की 10 मिनीट आधी
या पण वर्षभराच्या सवयीचा परीणाम
तो होणारच.

मी खूप वेळेस पाहिलय की
एम.ए. प्रथम वर्षाच्या ब-याच मुलींना अगदी
माझ्यासारखा उशीर होतो. पण जी दोन
वर्ष उशीरा येण्याची मी चूक केली ती
चूक इतर मुलींकडून होऊ नये हाच
या मागचा हेतू. उशीरा वर्गात येणं किंवा
न येणं हे खर तर आम्हीच ठरवायला हवं
पण एक नियंत्रण किंवा एक शिस्त किंवा थोडासा
धाक तुमच्याजवळही असावा. रागावणं ही गोष्ट
वाईट नाही कधी कधी याचा परीणाम -

चांगल्याही होतो.

सर खरच तुम्ही खूप समजूतदार आहात. तुम्हाला आमच्या चुका जरी सांगायच्या असल्या तरी अगदी व्यवस्थित समजून सांगतात. संयमशील स्वभाव आहे. कोणत्याही उतावळेपणा किंवा उद्धटपणा हा जाणवत नाही. निरीक्षण किंवा परीक्षणही योग्य असेच आहे. तुम्ही तुमच्याकडे सोपवलेली जवाबदारी अगदी व्यवस्थित पार पाडतात. तुम्ही जेंव्हा गुरु परीक्षक होतात. तेंव्हा योग्यच परीक्षण करतात. अचूक परिक्षण योग्य निरीक्षण क्षमता तुमच्याजवळ आहे.

सर तुम्ही खूप वाचन करता नेहमी ग्रंथालयात अगदी पाच पर्यंत वाचन करतात. वेगवेगळी पुस्तके, कपाट, हाताळत असतात. योग्य वेळी योग्य सूचना विद्यार्थ्यांना देतात. ज्याला जे पुस्तक हव ते पुस्तक शोधून देतात. (माझं खूप वाचन आहे, मी गुरु प्राध्यापक आहे, नेट पास आहे या कुठल्याही गोष्टीचा गर्व, अहंकार तुमच्याजवळ नाही. किंबहुना तसं तुम्ही दाखवत ही नाही.) अगदी साधे सरळपणाने अगदी हसत-खेळत सर्वांशी तुम्ही बोलता.

विद्यार्थ्यांना नेहमी प्रोत्साहन देतात. सेट-नेट च योग्य मार्गदर्शनही करतात खर तर हे अभ्यासाव्यतिरिक्त म्हणजे विद्यापीठाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमा व्यतिरिक्त आहे. पण नेहमी योग्य

मार्गदर्शन करता. [ काय करायचा सेट नेट ची परीक्षा देत आहात. अभ्यासक्रम माहित नाही, अक्षरच नीट नाही. कालखंड च माहीत नाही. असे म्हणून खरे तर विद्यार्थ्यांचे खच्चीकरण करणारे काही प्राध्यापक आहेत. ] असे तुम्ही कधीही विद्यार्थ्यांना हिणवत नाहीत उलट त्यांना प्रोत्साहन देऊन योग्य मार्गदर्शन तुम्ही करतात.

आपल्या हातून कसल्याही प्रकारची चूक होऊ नये. याची तुम्ही नेहमी दक्षता घेता. कधी कोणत्याही विद्यार्थ्यांना तुम्ही नाराज करत नाहीत. तुम्ही विद्यार्थ्यांचा नेहमी आदर करता. आणि विद्यार्थीपण तुमचा खूप आदर करतात ही मुलांच्या बोलण्यावरून नेहमी लक्षात येते. ज्याप्रमाणे तुम्ही विद्यार्थ्यांना कधीही नाराज करत नाहीत त्याप्रमाणे ईश्वरानेही पूर्ण आयुष्यात तुम्हाला कधीही कोणत्याही गोष्टीबद्दल नाराज करू नये.

शिक्षक हा नेहमी चांगल्या विद्यार्थ्यांची निर्मिती करतो. समाजाच्या जडणघडणीचा [illegible] प्राध्यापकच आहे

" जुल्म [illegible] चलो
सत्य की पुकार है
देश की सलामती का
आज तुम पे भार है। "